**परिपत्रक नं. 17**
**(जनरल विभाग )**

**रयत शिक्षण संस्था, सातारा**
**दि. 29/06/2017**

**सर्वश्री शाखाप्रमुख ,**
**रयत शिक्षण संस्था,**

यांना . . . . . .

**विषय - <u>वृक्षारोपन करणेबाबत</u>.**

४ आक्टोंबर २०१९ रोजी रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेस १०० वर्ष पूर्ण होणार आहेत. सदरचा शताब्दी महोत्सव संस्थेमार्फत सर्व विभागात भव्यप्रमाणात साजरा करावयाचा आहे, त्यासाठी संस्थेमार्फत निरनिराळे समाजउपयोगी अनेक उपक्रम राबविण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून संस्थेच्या सर्व शाखांनी विद्यार्थी, पालक, सेवक व कार्यकर्त्यांच्या मदतीने / सहकार्याने वृक्षारोपनाचा कार्यक्रम जुलै / ऑगस्ट २०१७ मध्ये आयोजित <u>करुन वृक्षारोपणाची सामाजिक लाट निर्माण करावी.</u>

रयत शिक्षण संस्थेच्या प्रत्येक शाखेत संस्थेचे बोधचिन्ह असलेले किमान एक वडाचे झाड लावावे. सदरचे झाड लावताना शाखेची इमारत, कपौंड इत्यादी पासून योग्य त्या प्रमाणात व पुरेशी जागा सोडावी. तसेच गावातील दर्शनी जागी, चौकामध्ये, रस्त्याच्याकडेला अथवा सार्वजनिक ठिकाणी पुरेशी जागा असल्यास तेथे वडाचे झाड त्याचप्रमाणे स्थानिक वातावरण विचारात घेऊन निरनिराळ्या वृक्षांची लागवड करावी. वृक्षारोपणासाठी व झाडांचे व्यवस्थित संगोपन करण्यासाठी विद्यार्थ्यांचे गट करुन त्यांच्यावर जबाबदारी सोपवावी आणि वेळोवेळी शाखाप्रमुखांनी सेवकांच्या मदतीने या कामाचा आढावा घेऊन आपला अहवाल विभागीय कार्यालयाकडे / संस्था कार्यालयाकडे पाठवावा. प्रत्येक शाखेमार्फत कमीतकमी **पाचशे** झाडांचे **<u>वृक्षारोपन व संगोपन</u>** होईल यादृष्टीने शाखाप्रमुखांनी नियोजन करावे. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, सामाजिक वनीकरण व निरनिराळ्या सामाजिक संस्थांकडून जास्तीतजास्त झाडांची रोपे मिळविण्याचा प्रयत्न करावा.

या महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे संस्थेने शताब्दी वर्षामध्ये शक्यतो उपक्रमाची सुरुवात करण्याऐवजी महोत्सवाचे औचित्य साधून सुरु केलेले प्रकल्प पूर्णत्वास नेण्याचा संकल्प सोडलेला आहे. सदरचीबाब विचारात घेऊन शाखाप्रमुखांनी दोन वर्षामध्ये वृक्षारोपनाचा हा प्रकल्प रयत शिक्षण संस्थेच्या नावलौकिकात भर घालणारा ठरावा म्हणून प्रयत्न करावा.

**सचिव,**
**रयत शिक्षण संस्था, सातारा**

**प्रत माहितीसाठी रवाना -**

1.मा.चेअरमन,रयत शिक्षण संस्था, सातारा
2. श्री.सहसचिव (माध्य/उ.शि.),रयत शिक्षण संस्था, सातारा
3. सर्वश्री विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था, सातारा

Letter/ CircularA4-11